# Journal of Research and Development

A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-12(A)| December 2025


Original Article

# स्वातंत्र्योत्तर काळातील नांदेड जिल्ह्याची शैक्षणिक परिस्थिती : एक ऐतिहासिक आढावा (इ.स.1948-2004)


**अंभोरे नारायण दिगांबर**
संशोधक विद्यार्थी, नुतन महाविद्यालय, सेलू
**Email:** narayanpatil5701@gmail.com



**Manuscript ID**:
JRD -2025-171210
ISSN: 2230-9578

Volume 17
Issue 12(A)
Pp. 58-61
December 2025

**Submitted:** 16 Nov. 2025
**Revised:** 26 Nov. 2025
**Accepted:** 11 Dec. 2025
**Published:** 31 Dec. 2025



***सारांश***

*स्वातंत्र्योत्तर काळातील नांदेड जिल्ह्याची शैक्षणिक परिस्थिती ही ऐतिहासिक, सामाजिक व राजकीय घटकांच्या प्रभावाखाली घडलेली आहे. प्राचीन काळात नांदेड जिल्ह्याला समृद्ध शैक्षणिक परंपरा लाभलेली होती; मात्र मध्ययुगीन मुस्लिम राजवट व विशेषतः निजामशाहीच्या प्रतिगामी शैक्षणिक धोरणांमुळे जिल्हा शैक्षणिकदृष्ट्या मागास राहिला. 17 सप्टेंबर 1948 रोजी हैद्राबाद संस्थान भारतात विलीन झाल्यानंतर नांदेड जिल्ह्यात शिक्षणाच्या प्रसाराला सुरुवात झाली. प्रारंभी कमी साक्षरता दर, आर्थिक दारिद्र्य, प्रादेशिक असमतोल व प्रशासकीय अडचणी यांमुळे शैक्षणिक प्रगती संथ राहिली. 1956 नंतर भाषावार राज्यरचनेमुळे मातृभाषेतून शिक्षणाचा मार्ग मोकळा झाला. 1980 नंतर स्वयंसेवी शिक्षण संस्थांच्या योगदानामुळे तसेच उच्च शिक्षण संस्थांच्या स्थापनेमुळे जिल्ह्यात शैक्षणिक जागृती निर्माण झाली. एकविसाव्या शतकात प्रवेश करताना नांदेड जिल्ह्याच्या शैक्षणिक विकासाला गती मिळाल्याचे दिसून येते.*



***मुख्यशब्द:*** *नांदेड जिल्हा, स्वातंत्र्योत्तर काळ, शैक्षणिक परिस्थिती, निजाम राजवट, साक्षरता, प्रादेशिक असमतोल, मराठवाडा, शैक्षणिक विकास, उच्च शिक्षण, स्वयंसेवी संस्था*


## प्रस्तावना

मानवी जीवनाच्या इतिहासामध्ये शिक्षणाला अतिशय महत्त्वाचे स्थान आहे. शिक्षण हे समग्र परिवर्तनाचे साधन असल्यामुळे प्राचीन काळापासूनच मानवी जीवनाचा विकास व प्रगती शिक्षणामुळेच झाली. ज्या काळात शिक्षणाची दुरावस्ता झाली. तो काळ ही मागासलेला राहिलेला दिसतो. हजारो वर्षांच्या इतिहासात भारताला समृद्ध शैक्षणिक वारसा लाभलेला आहे. प्राचीन काळात भारतातील तक्षशिला, नालंदा, विक्रमशिला या विद्यापीठातील शिक्षणाने जगाला आकर्षित व प्रभावीत केले होते. प्राचीन काळात नांदेड जिल्ह्याच्या परिसरात अनेक शिक्षणाची केंद्रे निर्माण झाली होती. सातवाहन राजवटी पासून ते यादव राजवटीपर्यंत या शैक्षणिक केंद्रोचे अस्तित्व नांदेड जिल्ह्याच्या परिसरात होते. परंतू मध्ययुगात मुस्लीम रावटीमध्ये निर्माण झालेल्या नव्या शिक्षण व्यवस्थेमुळे प्राचीन शिक्षण पद्धतीला तडे गेले. स्वातंत्र्यापूर्वीचा अतिशय महत्त्वाचा काळा म्हणजे निजाम राजवटीचा होता. या राजवटीमध्ये जिल्ह्यातील जनता पारतंत्र्यात जगत होती. आपला स्वाभिमान व अस्तित्व हरपून बसली होती. या काळात काही सरमंजामदार, जहागिरदार निजामाला सहाय्य करत ऐशआरामाचे जीवन जगत होते. पण बहुसंख्य लोकांच्या जीवनात अंधकार होता.


***Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)***
*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*



**Address for correspondence:**
*अंभोरे नारायण दिगांबर, संशोधक विद्यार्थी, नुतन महाविद्यालय, सेलू*



**How to cite this article:**
*दिगांबर, . अंभोरे . नारायण . (2025). स्वातंत्र्योत्तर काळातील नांदेड जिल्ह्याची शैक्षणिक परिस्थिती : एक ऐतिहासिक आढावा (इ.स.1948-2004). Journal of Research and Development, 17(12(A)), 58–61.*
*https://doi.org/10.5281/zenodo.18183635*

Quick Response Code:

Website:
https://jrdrvb.org/

DOI:
10.5281/zenodo.18183635


OPEN ACCESS

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-12(A)| December 2025

शेवटी भारत सरकारने 17 सप्टेंबर 1948 रोजी पोलीस कारवाई करुन हे संस्थान भारतीय संघराज्यात विलीन केले. त्यामुळे नांदेड जिल्ह्यात एका नव्या युगाला सुरुवात झाली. इ.स. 1948 पर्यंत शैक्षणिकदृष्ट्या अतिशय मागास राहिलेल्या नांदेड जिल्ह्यात स्वातंत्र्यानंतर काय परिवर्तने झाली. कशाप्रकारे जिल्ह्याचा शैक्षणिक विकास झाला याचा आढावा प्रस्तुत लेखात केला आहे.

**स्वातंत्र्यपूर्व काळातील नांदेड जिल्ह्यातील शिक्षण:**

गोदावरी काठी वसलेल्या नांदेड जिल्ह्याला मोठा ऐतिहासीक, सांस्कृतिक व शैक्षणिक वारसा लाभलेला होता. अश्मयुगामध्येही परिसरात मानवी जीवनाचे अस्तित्व होते याचे अनेक पुरावे या परिसरात सापडले आहेत. नांदेड जिल्ह्याच्या ऐतिहासिक काळाची स्पष्ट माहिती खऱ्या अर्थाने जनपदाच्या काळापासून मिळते. अश्मक या जनदामध्ये नांदेड जिल्ह्याचा समावेश होता. जिल्ह्याचा प्रारंभीक विकास हा अश्मक जनपदाच्या काळातच झाला. पुढे सातवाहन, वाकाटक, चालूक्य, राष्ट्रकूट, उत्तरकालीन चालूक्य, यादव यांच्या राजवटीत नांदेडला मोठे वैभव प्राप्त झाले होते. नांदेड जिल्ह्यात अनेक शिक्षणाची केंद्रे या काळात निर्माण झाली होती. वेगवेगळया विषयाचे ज्ञान या केंद्रांमधून विद्यार्थ्यांना दिले जात होते.

मुस्लीम राजवटीमध्ये मात्र जिल्ह्यातील ही शिक्षणाची केंद्रे उध्दवस्त झाली. या काळात मुस्लीम राज्यकर्त्यांनी आपल्या धर्माला अनुसरुन नवी शिक्षण पद्धती निर्माण केली. ही शिक्षणपद्धती मुस्लीमांना अनुकूल तर हिंदूना प्रतिकूल होती. निजामकाळामध्ये तर जिल्ह्याच्या शिक्षण क्षेत्रात पुर्णपणे अधंकार निर्माण झाला होता. अतिशय प्रतिगामी प्रवृत्तीच्या असलेल्या निजामांच्या शैक्षणिक धोरणामुळे नांदेड जिल्हा स्वातंत्र्यानंतरही अनेक वर्ष मागासच राहिला. खऱ्या अर्थाने जिल्ह्याच्या मागासलेपणाचे मूळ निजामाच्या शैक्षणिक धोरणात आहे.

**स्वातंत्र्याचा काळ व नांदेड जिल्ह्यातील साक्षरता :**

नांदेडच्या शैक्षणिक कार्याची सुरुवात खऱ्या अर्थाने इ.स. 1948 पासुन सुरु होते. तत्पुर्वी 13 व्या शतकापासून ते निजाम राजवटीपर्यंत चालत आलेल्या मुस्लीम राजवटीत शिक्षणाला कोणतेही महत्व दिले गेले नव्हते. त्यामुळे नांदेड जिल्हा इ.स. 1948 पर्यंत मागासलेला होता. स्वातंत्र्यानंतर मात्र परिस्थिती बदलू लागली. आणि जिल्ह्यात शिक्षणाच्या प्रसारासाठी प्रयत्न केले जाऊ लागले. या प्रयत्नामुळे जिल्ह्यातील अनेक ठिकाणी शाळा स्थापन केल्या गेल्या. परंतु निजाम राजवटीत कोणताही शैक्षणिक वारसा न मिळाल्यामुळे व तत्कालीन आर्थिक दारिद्र्यामुळे स्वातंत्रनंतरही बरीच वर्ष शैक्षणिक विकास झाला नाही. इ.स.1951 मध्ये जिल्ह्यातील साक्षरता दर 7.89% होता. तो. इ.स.1961 मध्ये15.14 इतका झाला. स्त्रियांच्या साक्षरतेबाबत पाहिले तर इ.स.1951 मध्ये 1.97% असलेला साक्षरता दर 1961 मध्ये 5.16% वर गेला. हा बदल निश्चितच चांगला नव्हता.

**प्रादेशिक व राजकीय संक्रमणाचा काळ व नांदेड जिल्ह्यातील शिक्षण :**

स्वातंत्र्यानंतरच्या काळातील काही वर्षे जिल्ह्यातील प्रादेशिक व राजकीय घडामोडीच्या दृष्टीने संक्रमनाची होती. कारण या काळात मराठवाडा मुक्त होऊनही नव्याने स्थापन झालेल्या हैद्राबाद राज्यात इ.स.1956 पर्यंत होता. त्यामुळे मराठवाडयासहीत नांदेड जिल्ह्यालाही स्थिरता प्राप्त झाली नव्हती. राजकीय दृष्टीने स्वातंत्र्यानंतरच 130 दिवस ऑपरेशन पोलोचे नेतृत्व करणारे मेजर जनरल जे. एल.चौधरी, यांनी गर्व्हनर म्हणून या प्रदेशाचा कार्यभार पाहिला. त्यानंतर 26 जानेवारी 1950 ते 06 मार्च1952 पर्यंत एम.के.वेगोडी यांनी हैद्राबाद राज्याचे मुख्यमंत्री म्हणून कार्य केले.

तर या काळातच हैद्राबाद राज्याचे शिक्षण मंत्री म्हणून देवीसिंग चव्हाण यांनी जबाबदारी पार पाडली. शिक्षणमंत्री म्हणून त्यांनी मराठवाडयासहीत नांदेड जिल्ह्यातही गाव तेथे शाळा सुरु करण्याचे धोरण निश्चित केले. स्वातंत्र्यसेनानी, संस्थाचालक, शिक्षक व गावातील प्रमुख मंडळीना शाळा सुरु करण्यासाठी प्रोत्साहीत केले. परंतु काळाचा विचार करता असंख्य अडचणीमुळे गाव तेथे शाळा हा विचार प्रत्यक्षात येऊ शकला नाही. याच काळात हैद्राबाद राज्यातील शिक्षण विभागाचे संचालक सेतु माधवराव पगडी होते. त्यांना येथील मागासलेपण कळत असल्यामुळे त्यांनी शिक्षणाच्या क्षेत्रात चांगल्या सुधारणा केल्या.

**प्रादेशिक असमतोल व नांदेड जिल्ह्यातील शिक्षण:**

इ.स.1956 मध्ये भाषीक राज्य स्थापन झाले. व नांदेड जिल्हा आपल्या मराठी बांधवाच्या प्रदेशात मोठया आनंदाने कोणतीही अट न घालता सामील झाला. परंतु येथेही मराठवाडयाची उपेक्षाच झाली. शिक्षण हे समग्र परिवर्तनाचे साधन आहे.विकासाचा आधार आहे. ते जर अव्वल दर्जाचे असेल तर मागास भागाचा देखील कायापालट होऊ शकतो. परंतु मागास असलेल्या नांदेड जिल्ह्याचा

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-12(A)| December 2025

शैक्षणिक विकास व्हायला 21 वे शकत उजडावे लागले. विसाव्या शतकाच्या शेवटापर्यंत साक्षरतेच्या दृष्टीने मराठवाडा पश्चिम महाराष्ट्राच्या तुलनेत 20 वर्षे मागे होता. 40 % आदिवासी लोकांचा असलेला धुळे जिल्हा साक्षरतेच्या बाबतीत नांदेड जिल्ह्यापेक्षा पुढे होता. इ.स. 1956 नंतर मराठवाडयातील शैक्षणिक पद्धतीत बदल करुन ती उर्वरीत महाराष्ट्रासारखी करण्यात आली. या बदलामुळे नांदेड जिल्ह्यात उर्दूचे महत्व कमी होऊन मातृभाषेला महत्व प्राप्त झाले. व शाळेत मातृभाषेतून शिक्षण मिळण्यास सरुवात झाली. परंतू हैद्राबाद राज्य व समकालीन मुंबई राज्य यांच्या शैक्षणिक धोरणात मोठा फरक होता. त्यामुळे बरेच व्यावसायीक प्रश्न निर्माण झाले होते. सुरुवातीच्या काळात औरंगाबाद येथे विभागीय परिक्षा मंडळ नव्हते. त्यामुळे येथील सर्व कारभार पुणे विभागीय मंडळाच्या हाती होता. त्यामुळे स्थानिक प्रश्न या अधिकाऱ्यांना समजलेच नाही. त्यामुळेही मराठवाडयातील व नांदेड जिल्ह्यातील शिक्षणाची परवड झाली.

**80 चे दशक म्हणजे जिल्ह्यातील शैक्षणिक प्रबोधणाचा काळ:**

जिल्ह्याच्या शैक्षणिक इतिहासामध्ये 20 व्या शतकातील 80 चे दशक अतिशय महत्वाचे होते. या काळात जिल्ह्यातील शिक्षण प्रक्रियेमध्ये अनेक बदल झाले. या बदलामुळे प्राथमिक शिक्षणापासुन ते विद्यापीठीय शिक्षणापर्यंत मोठे बदल झाले. त्यामुळे या काळात जिल्ह्यामध्ये शैक्षणिक दृष्ट्या बरेच अनुकूल वातावरण निर्माण झाले. अनेक स्वयंसेवी शिक्षण संस्था याच काळात स्थापन झाल्या. या संस्थांनी अनेक ठिकाणी शाळा स्थापन केल्या. खरे तर हे नांदेड जिल्ह्याचे प्रबोधन युग होते असे म्हटले तर वावगे ठरु नये.

इ.स. 1987-88 साली नांदेड जिल्ह्यात पूर्व प्राथमिक, प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक व महाविद्यालय या सर्वांची संख्या 2098 होती. त्यामध्ये एकूण 10165 शिक्षक अध्यापन करीत होते. पैकी 1650 महिला होत्या. यामध्ये 8879 एवढे शिकृषक प्रशिक्षित होते. तर 1387 महिला शिक्षिका प्रशिक्षीत होत्या. या सर्व संस्थामध्ये एकूण 409611 विद्यार्थी शिक्षण घेत होते.

**इ.स. 2002-03 मधील नांदेड जिल्ह्यातील शैक्षणिक संस्था, विद्यार्थी व शिक्षक संख्या :**

इ.स.2002-03 सालापर्यंत नांदेड जिल्ह्याची शैक्षणिक परिस्थिती पुढीलप्रमाणे होती. या वर्षामध्ये जिल्ह्यातील एकूण प्राथमिक शाळांची संख्या 2709 होती. तर 46174 विद्यार्थी यामध्ये शिक्षण घेत होते. आणि शिक्षकांची संख्या 10432 होती. तर याच वर्षात जिल्ह्यातील माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांची संख्या 423 होती. तर 349000 एवढे विद्यार्थी शिक्षण घेत होते. तर 7000 शिक्षक अध्यापन करत होते. उच्च शिक्षणाचा विचार करता या वर्षात सर्व प्रकारच्या उच्च महाविद्यालयांची संख्या 22 होती. तर विद्यार्थी संख्या 26000 आणि शिक्षक संख्या 373 होती. प्राथमिक शिक्षणापासून ते उच्च शिक्षणापर्यंत बदल व्हावेत याकरीता मोठे प्रयत्न केले गेले. उच्च शिक्षणाच्या सोयीसाठी मराठवाड्या पहिले महाविद्यालये पिपल्स कॉलेज या नावाने स्वामी रामानंद तीर्थ यांनी इ.स. 1950 साली सुरु केले. या महाविद्यालयात संपूर्ण मराठवाडयातील मुले शिक्षण घेऊ लागली. हळू-हळू नांदेड परिसरात कला, वाणिज्य, विज्ञान, तंत्रज्ञान, कायदा, कृषी इ. शाखांचे उच्च शिक्षण देणारी महाविद्यालये स्थापन होऊ लागली. 1963 साली स्थापन झालेल्या यशवंत महाविद्यालयाने जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या, बहुजनांच्या मुलांना उच्च शिक्षणाची संधी मिळवून दिली. इ.स. 1994 साली स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाची स्थापना झाल्यामुळे मोठ्या प्रमाणात जिल्ह्यामध्ये उच्च शिक्षणामध्ये विकास होऊ लागला.

**निष्कर्ष**

स्वातंत्रोत्तर काळातील नांदेड जिल्ह्यातील शैक्षणिक परिस्थिती पाहता फारशी समाधानकारक नव्हती. स्वातंत्र्यापूर्वी शैक्षणिक मागास राहिलेला नांदेड जिल्हा पुढील अनेक दशके शिक्षणाच्या क्षेत्रात मागासच राहिलेला दिसतो. याशिवाय प्रादेशिक असमतोलामुळे ही जिल्ह्याचे बरेच नुकसान झाले. त्यामुळे जिल्ह्यात निरक्षरांची संख्या मोठया प्रमाणात राहिली होती. इ.स. 1975 सालापर्यंत जिल्ह्यात गाव तेथे शाळा सुद्धा स्थापन होऊ शकली नव्हती. ज्या शाळा होत्या त्या एकशिक्षकी असल्यामुळे दर्जेदार शिक्षण विद्यार्थ्यांना मिळत नव्हते. 1960 मध्ये नांदेड जिल्ह्यातील सर्व शाळा जिल्हा परिषदेंकडे वर्ग करण्यात आल्या. या जिल्हा परिषदांमध्ये राजकीय हस्तक्षेप मोठया प्रमाणात असल्यामुळे ग्रामीण भागातील ही शिक्षणाची मंदिरे समृद्ध होऊ शकली नाहीत. खऱ्या अर्थाने जिल्ह्याचा शैक्षणिक विकास व्हायला एकविसावे शतक उजडावे लागले.

**संदर्भग्रंथ सुची**

1. गोगटे श्री.ब.- मराठवाड्यातील प्राथमिक शिक्षणाचा अभ्यास, प्रकल्प अहवाल, स्वामी रामानंद तीर्थ संशोधन संस्था, औरंगाबाद, जानेवारी-1984, प्रका. जयहिंद प्रिंटिंग प्रेस, औरंगाबाद.

2. कुलकर्णी भुजंगराव, मराठवाडा-2001, खंड-२ प्रका., संयोजन समिती, मराठवाडा, औरंगाबाद-1988.
3. जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन, नांदेड जिल्हा.,2000-2001 अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र शासन मुंबई.-2001.
4. शिक्षणावर दृष्टीक्षेप 1994-95 शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.,-1996.
5. जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन, नांदेड जिल्हा.,1988-1989 अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र शासन मुंबई.-2001.
6. District Census handbook 1961 Nanded.
7. वार्षिक अहवाल,शिक्षण विभाग, जिल्हा परिषद, नांदेड-2000-01.
8. स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, वार्षिक अहवाल-1995-96.